सेवा प्रवेश नियम

उच्च पदावरील पदोन्नतीसाठी
किमान सेवेच्या [illegible] तरतूद.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-१२७७/बारा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: ३ सप्टेंबर, १९७९.

प रि प त्र क

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१२७७/बारा, दिनांक १४ ऑक्टोबर, १९७७ च्या पहिल्या परिच्छेदाच्या संदर्भात शासन, खाली नमूद केल्याप्रमाणे पुढील आदेश देत आहे:-

[१] वर्ग २ च्या पदावरील पदोन्नतीसाठी वर्ग ३ मध्ये किमान ५ वर्षाचा सेवाकाल आवश्यक आहे. त्यापैकी दोन वर्षाचा सेवाकाल हा पदोन्नतीसाठी असलेल्या पदाच्या निकटतम तृतीय वर्गातील निम्न पदावरील असावा.

[२] त्याचप्रमाणे उच्च पदावरील नेमणूकीसाठी सेवाप्रवेश नियमात असलेली किंवा नवीन सेवाप्रवेश नियम तयार करताना विहित करण्यात येणारी किमान सेवेची अट पूर्ण करणारे उमेदवार उपलब्ध होण्याची जर शक्यता नसेल तर ती अट शिथिल करण्याची तरतूद सेवाप्रवेश नियमात अंतर्भूत करण्यात यावी.

२. मंत्रालयातील सर्व विभागांना विनंती करण्यात येते की, उच्च पदावरील पदोन्नतीचे विनियमन करण्यासाठी संवर्गातील तत्कालीन स्थिती लक्षात घेऊन निरनिराळ्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांचे पुनर्विलोकन करावे आणि आवश्यक असेल तेथे वर नमूद केलेल्या आदेशांच्या आधारे सुधारणा करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
कृ. रा. निलावर,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
सर्व मंत्रालयीन विभाग,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागातील इतर विभागाध्यक्ष व कार्यालय प्रमुख.

दिवेकर२०११९१